# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)


दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११९०
२५६२ ११९१
२५६२ ११९२
२५६२ ११९३

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई—मेल:affiliation@pun.unipune.ac.in
affiliation@unipune.ac.in


संदर्भ क्र.: सीए/ 1683

दिनांक : 28/09/2025

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. मा.अध्यक्ष/सचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये
नवीन महाविद्यालयांसाठी प्रस्ताव सादर करणा—या नवीन संस्था.

२. मा.प्राचार्य/संचालक,
संलग्नित अव्यावसायिक महाविद्यालये,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय :— शैक्षणिक वर्ष २०२६—२७ करिता नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणांतर्गत नवीन तुकडी/ विद्याशाखा/अभ्यासक्रम यांचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) ऑनलाईन प्रणालीमार्फत शासनास सादर केलेल्या परिपूर्ण अर्जाची प्रत विद्यापीठास (Hard Copy) सादर करणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९(३)(क) मधील तरतुदीनुसार नवीन महाविद्यालय तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९(४)(ग) मधील तरतुदीनुसार विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम/विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याकरिताचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी “नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली” **(New College Permission System) (NCPS)** ही ऑनलाईन प्रणाली विकसित केलेली आहे. सदर प्रणालीची लिंक **https:htedu.maharashtra.gov.in/NCPS/** अशी असून ऑनलाईन अर्ज ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत सादर करावयाचे आहेत.

सर्व प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीमध्ये आवश्यक प्रक्रिया शुल्कासह सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. **शासनास ऑनलाईन पध्दतीने सादर केलल्या प्रस्तावांची हार्ड कॉपी एक प्रत प्रस्तावासाठी जमा केलेल्या शुल्काच्या रकमेच्या पावतीच्या प्रतीसह दिनांक १०/१०/२०२५ पर्यंत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्नता कक्षामध्ये जमा करावी. प्रस्ताव सादर करण्यापूर्वी खालील मुद्यांचे अवलोकन करावे.**

**१. "परिशिष्ट– अ" तपासणी सूचीतील अनुक्रमांकानुसार सर्व कागदपत्रे जोडावीत.**

**२. प्रत्येक कागदपत्रास अनुक्रमांक द्यावा व पताका लावावेत.**

**३. प्रस्तावातील प्रत्येक पानांवर संस्था/महाविद्यालयाचा शिक्का व साक्षांकन करावे. (नविन महाविद्यालयाचा प्रस्ताव असेल तर संस्थेचा शिक्का व अध्यक्ष/सचिव यांची स्वाक्षरी तसेच विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम/विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव असल्यास महाविद्यालयाचा शिक्का व प्राचार्यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.)**

**"नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" (New College Permission System) (NCPS) या ऑनलाईन प्रणाली व्यतिरिक्त ऑफलाईन पध्दतीने भरलेले कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

आपली,

(सुनिता हजारे)
उपकुलसचिव